महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्र. १४४७(२)/२०२२/वीस** **दिनांक:- १७ नोव्हेंबर,२०२३**

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ मुलाखतीबाबत**

**संदर्भ :-१) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**
**२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १० नोव्हेंबर,२०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखत कार्यक्रम दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेच्या मुलाखती दिनांक **३० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक १२ जानेवारी, २०२४** या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखतीचे केंद्र नवी मुंबई, नाशिक, लातूर, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर व नागपूर अशी नमूद केली आहेत. तथापि, काही प्रशासकीय कारणास्तव **लातूर व कोल्हापूर ही केंद्रे रद्द करण्यात आली असून** या केंद्रावरील उमेदवारांच्या मुलाखती नियोजित दिनांकास आयोगाच्या नवी मुंबई येथील कार्यालयात घेण्यात येणार आहेत. उमेदवारांना लवकरच मुलाखत पत्रे पाठविण्यात येत आहेत. त्यात मुलाखतीचे ठिकाण, दिनांक, वेळ अन्य माहिती सूचनां इत्यादी बाबींचा समावेश असेल, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव
(राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.